**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** सिंहगड रोड पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0321 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि** 28/06/2025 13:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Date From (दिनांक पासून):** 25/03/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/06/2025
   **Time Period (कालावधी):**
   **Time From (वेळेपासून):** 16:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 21:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/06/2025 **Time (वेळ):** 12:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 017
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/06/2025 12:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** राधा प्युअर व्हेज,सिंहगडरोड , येथील रोडवर तक्रारदार यांचे, फोर्ड ईको स्पोर्ट वाहन क्रं , MH12QT9797

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

प्रत मिळाली
[illegible]
[illegible]



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रोहिदास ज्ञानदेव सातपुते
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** ज्ञानदेव सातपुते
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | स49/2,फलट नं 4,हरेकष्णा, कम्प्लेक्स,भाजी बाजार,चंदननगर,पुणे, चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | स49/2,फलट नं 4,हरेकष्णा, कम्प्लेक्स,भाजी बाजार,चंदननगर,पुणे, चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822049797

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र हिंदूराव पोवार | | वडील का नाम : हिंदूराव पोवार | 1. चंद्रांगण, फेज 7,ई बिल्डींग,बी 11,आंबेगाव पठार पुणे , सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अमित बबन भुसारी | | वडील का नाम : बबन भुसारी | 1. एल 14, फरेस्ट कौंटी,खराडी, पुणे,खराडी पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**



Scanned with CamScanner

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रूपये 500/ दराच्या 70 चलनी नोटा | 35,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

35,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.28/06/2025
मी रोहिदास ज्ञानदेव सातपुते, वय 49 वर्षे, धंदा - इस्टेट एजंट, रा. स.49/2, फलॅट नं 4, हरेकृष्णा
कॉम्प्लेक्स, भाजी बाजार, चंदननगर, पुणे 14 मो नं 9822049797/9028049797
आज रोजी मी समक्ष हजर राहुन जबाब लिहुन देतो की, मी व माझा मित्र निलेश अर्जुनराव टोपे रा. स.नं. 50/2 प्लॉट नंबर 24 शिवराज चौक चंदननगर पुणे 14 असे दोघांनी मिळुन सन 2015 मध्ये सव्हे नं 24/6 फलॅट नं बी/16, तीसरा मजला, विशाल पार्क सोसायटी, विठठलवाडी हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे येथे 2 बिएचके फलॅट विकत घेतला होता व तो फलॅट आनंद गणेश खरे व अमोल आनंद खरे यांना महिना 7000 रुपये भाडे तत्वावर दिला होता, त्याबाबतचा आमचेमध्ये लिव्ह अँण्ड लायसन्स करार झालेला होता. परंतु आमचे भाडेकरु आनंद खरे व अमोल खरे यांनी आम्हाला कोणतेही भाडे न देता आमचा फलॅट खाली करण्यास नकार दिला. म्हणुन आम्ही त्यांचेवर कायदेशिर कारवाई करुन त्यांना नोटीस बजावली होती परंतु तरीही त्यांनी फलॅट खाली केला नाही किंवा कोणतेही भाडे दिले नाही, म्हणुन आम्ही त्यांचेविरुध्द मा. सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे यांचेकडे दावा दाखल केला. त्या दाव्याचा निकाल आमच्या बाजुने लागला. त्यानंतर आम्ही फलॅटचा ताबा मिळावा म्हणुन सदर न्यायालयाकडे दरखास्त दाखल केली. त्या दरखास्तीवरुन दिनांक 04/03/2025 रोजी मा.सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे यांनी आम्हाला दिनांक 08/04/2025 रोजी ताबा देणेबाबत आदेश केले होते. दि. 17/03/2025 रोजीचा आदेश आम्हाला मिळाल्याने ताबा आदेशाची अंमलबजावणी करणारे मा. सक्षम प्राधीकारी यांनी प्राधीकृत केलेले लिपीक रविंद्र हिंदुराव पोवार यांना मी व माझा मित्र निलेश टोपे असे दिनांक 17/03/2025 रोजी रविंद्र पोवार - लिपीक यांना भेटलो. सदरदिवशी त्या ठिकाणी लिपीक अमित भुसारी हे सुध्दा हजर होते. त्यावेळेस त्या दोघांनी सदर आदेशाची अंमलबजावणी व ताबा करुन देण्याची विनंती केली असता त्यांनी माझेकडे माझा मित्र निलेश अर्जुनराव टोपे यांचे समक्ष 40,000/- रुपये लाचेची मागणी केली होती. म्हणुन मी व माझा मीत्र निलेश टोपे यांनी विचार करुन दिनांक 21/03/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात मा.सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे मध्ये काम करणारे लिपीक 1) रविंद्र हिंदुराव पोवार 2) अमित बबन भुसारी यांचेविरुध्द कायदेशिर तक्रार देण्यासाठी गेलो होतो. त्याठिकाणी आम्ही श्री. दयानंद गावडे, पोलीस उपअधिक्षक यांना भेटलो व आमची तोंडी तक्रार सांगीतली यावर श्री.गावडे साहेबांनी तात्काळ तेथील अधिकारी पोनि लोणारे यांचेकडे पाठविले पोनि लोणारे यांनी आमची तक्रार ऐकुन घेतली. सदर आदेशाची बजावणी करण्यापुर्वी 15 दिवस आगोदर भाडेकरु यांना ताबा वॉरंट बजवावे लागते, म्हणुन मी पोनि लोणारे यांना सांगीतले की, लोकसेवक श्री. रविंद्र हिंदुराव पोवार व अमित बबन भुसारी, लिपीक, भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे हे आमचे भाडेकरु यांना दि. 24/03/2025 रोजी दुपारनंतर नोटीस बजावणेकामी स नं 24/6, फलॅट नं बी/16, विशाल पार्क को-ऑपरेटीव्ह सोसायटी, हिंगणे खुर्द, पुणे येथे येणार आहेत, त्यावेळी त्यांनी आम्हास तिथे बोलाविले असल्याने आपण सदर दिवशी कारवाई करु विनंती

माझा मागील 20 वर्षापासुनचा रिअल इस्टेटचा व्यवसाय असुन त्यावर माझी उपजिवीका चालते. सदरचा व्यवसाय मी व माझा मित्र निलेश अर्जुनराव टोपे असे दोघे मिळुन करतो.



Scanned with CamScanner

केली व पुढील कारवाई दि. 24/03/2025 रोजी करण्याचे ठरविण्यात आल्याने पोनि लोणारे यांनी आम्हास दिनांक 24/03/2025 रोजी लाप्रवि कार्यालयात हजर राहणेबाबत सांगीतले होते. परंतु दिनांक 24/03/2025 रोजी मी पोनि लोणारे यांना फोन करुन श्री. रविंद हिंदुराव पोवार व अमित बबन भुसारी, क्लार्क, भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे हे दुस-या कामानिमीत्त बाहेर गेले असल्याने, ते उदया दिनांक 25/03/2025 रोजी नोटीस बजावणेकामी दुपारी 16.00 वा. येणार आहेत. त्यामुळे पुढील कारवाई आपण दि. 25/03/2025 रोजी करण्याची मी पोनि लोणारे यांना विनंती केली. त्यावेळी पोनि लोणारे यांनी आम्हास दि. 25/03/2025 रोजी दुपारी 15.00 वा चे सुमारास लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिली.

दि. 25/03/2025 रोजी पोनि लोणारे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी व माझा मित्र निलेश टोपे असे दुपारी 15.20 वा.कार्यालयात हजर झालो. त्यावेळी संपुर्ण पथक व पंच लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर होते. त्यानंतर पोनि लोणारे यांनी आमची, पंच संदिप पेमा वालकोळी व राहुल सोनवणे वरिष्ठ लिपीक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे व सापळा पथकास एकमेकांची ओळख करुन दिली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला माझी तक्रार दोन्ही पंचासमक्ष थोडक्यात कथन करण्यास सांगीतली असता ती मी दोन्ही पंचासमक्ष कथन केली. व मी माझी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली व माझा मित्र श्री निलेश टोपे यांनी तक्रारीबाबतचे संमतीपत्र लिहुन दिले. सदरची तक्रार व संमतीपत्र दोन्ही पंचांनी वाचले. मी कथन केलेली तक्रार व लिहुन दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री करुन दोन्ही पंचांनी सदर तक्रारीवर व संमतीपत्रावर सहया केल्या त्यानंतर पोनि लोणारे यांनी समक्ष म्हणुन सही केली. माझे तक्रारीचे अनुशंगाने पंच क्रं 1 म्हणुन श्री वालकोळी व पंच क्रं 2 म्हणुन श्री सोनवणे हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर मी पोनि लोणारे यांना लोकसेवक पोवार व भुसारी हे सायंकाळी 16.00 वा. पर्यंत सव्हे नं 24/6 फलॅट नं बी/16, तीसरा मजला, विशाल पार्क सोसायटी, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे येथे नोटीस बजावणेकामी येणार असलेबाबत त्यांनी कळवीले. त्यानंतर पुढील कारवाई राजाराम पुलाजवळ जाऊन करण्याचे पोनि लोणारे यांनी ठरविले. त्याप्रमाणे मी व माझा मित्र निलेश टोपे हे माझी चारचाकी फोर्ड ईको स्पोर्ट वाहन क्रं एमएच 12 क्युटी 9797 यामधुन व आमचे मागोमाग सापळा पथक व शासकीय पंच शासकीय वाहन ईटींगा क्रं एमएच-12-युसी 4109 ने दुपारी 15.50 वा. अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे कार्यालयातुन बाहेर पडून साधु वासवाणी चौक, नेहरु रोडमार्गे, हिंगणे खुर्द येथील कॅनॉलरोड जवळील मोकळ्या जागेमध्ये पोहोचलो. ती वेळ 16.30 वा ची होती. त्यानंतर पुढील कारवाई हिंगणे येथील कॅनॉल जवळील मोकळया जागेमधुनच करण्याबाबत पोनि लोणारे यांनी ठरविले. लोकसेवक येण्याची वेळ झाल्याने पोनि लोणारे यांनी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझे व पंच क्रं 01 श्री. वालकोळी यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 16.59 रेकॉर्ड केले व पडताळणी कारवाईच्या योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि लोणारे यांनी सायंकाळी 17.05 वा.चे सुमारास व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तो माझ्या शर्टच्या आत बनीयनला सेफटी पिनच्या सहाय्याने लावुन मी व माझा मित्र श्री टोपे व पंच क्र.1 श्री. वालकोळी यांचेसह माझी चारचाकी फोर्ड ईको स्पोर्ट वाहन क्रं एमएच 12 क्युटी 9797 यामधुन लोकसेवक 1) रविंद्र हिंदुराव पोवार, 2) अमित बबन भुसारी यांची भेट घेणेकामी रवाना केले. संपुर्ण सापळा पथक हे हिंगणे खुर्द, सिंहगडरोड येथील कॅनॉल रोडजवळील मोकळया जागेत थांबून राहिले त्यानंतर मी, माझा मित्र टोपे व पंच क्रं 1 श्री.वालकोळी असे माझे चारचाकी वाहनाने सव्हे नं 24/6 विशाल पार्क सोसायटी, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे येथे गेलो व वाहनातच थांबुन राहिलो. काहिवेळात सदर ठिकाणी एक पांढ-या रंगाची होंडा सिटी क्रं एमएच 12 टीवाय 9972 चारचाकी वाहन येवुन थांबले. त्यामधुन लोकसेवक रविंद्र पोवार व अमित भुसारी हे उतरले. त्यावेळी मी पंच श्री. वालकोळी यांना हेच लोकसेवक रविंद हिंदुराव पोवार व अमित बबन भुसारी असलेबाबत इशा-याने सांगीतले. त्यानंतर मी, माझा मित्र श्री टोपे व पंच क्रं 1 वाहनातुन खाली उतरलो. त्यानंतर मी लोकसेवक पोवार व भुसारी यांना नमस्कार करुन कामासंदर्भात चर्चा सुरु केली. त्यानंतर दोन्ही लोकसेवक हे नोटीस बजावणेकामी फलॅट नं बी/16, तीसरा मजला, विशाल पार्क सोसायटी, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे येथे पाय-याने निघाले तसे मी, माझा मीत्र टोपे व पंच क्रं 1 त्यांचे मागोमाग निघालो. सदर ठिकाणी जात असताना लोकसेवक व माझ्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक पोवार व भुसारी यांनी श्री खरे यांना नोटीस बजावली व त्यावर त्यांच्या सहया घेतल्या. त्यानंतर आम्ही पुन्हा पाय-याने खाली आलो. आम्ही खाली आल्यानंतर लोकसेवक भुसारी यांनी मला त्यांचे होंडा सिटी गाडीमध्ये बसण्यास सांगीतले. मी, लोकसेवक यांच्या वाहनामध्ये बसलो, तेव्हा माझा मित्र टोपे व पंच वालकोळी हे गाडीच्या दरवाज्याजवळ उभे राहीले, त्यावेळी गाडीच्या काचा उघडया होत्या. सदर वाहनामध्ये बसुन लोकसेवक पोवार यांनी नोटीस बजावलेबाबतचा लेखी अहवाल तयार केला. सदर अहवाल तयार करीत असताना आमच्या माझ्या कामासंदर्भात चर्चा सुरु होती. त्यानंतर अहवाल लिहुन पुर्ण झालेनंतर नमुद लोकसेवक पोवार यांनी सदर अहवालावर सही केली व माझी सही घेतली. त्यानंतर नोटीस बजावतेवेळी सदर ठिकाणी हजर असलेले इसम नामे



Scanned with CamScanner

संजय ताकवले व युनुय मोहंम्मद जकाती यांची साक्षीदार म्हणुन अहवालावर सहया घेतल्या. त्यानंतर लोकसेवक
पोवार हे मला "चहा घेऊ" असे म्हणाल्याने मी माझे वाहनाकडे गेलो व पंच, माझा मित्र श्री टोपे यांना माझ्या
वाहनात बसवुन सिंहगड रोडवरील मल्हार किचन हॉटेलमध्ये निघालो. आमचे मागोमाग नमुद लोकसेवकही त्यांचे
पांढ-या रंगाची होंडा सिटी क्रं एमएच 12 टीवाय 9972 वाहनाने आले. सिंहगड रोडवरील मल्हार किचन
हॉटेलच्या बाहेर आम्ही वाहन पार्क करुन हॉटेलमध्ये गेलो. आमचे मागोमाग दोन्ही लोकसेवकही हॉटेलमध्ये आले.
त्यानंतर आम्ही हॉटेलमधुन कॉफी घेतली व कॉफी घेऊन बाहेर येत असताना लोकसेवक पोवार हे मला "गाडीमध्ये
बसु" असे म्हणाले व इशा-याने पंच वालकोळी यांना बाहेर थांबण्याचा इशारा केला. म्हणुन पंच लोकसेवक यांचे
वाहनाच्या पुढील डावे दरवाज्याजवळ थांबुन राहिले त्यावेळेस वाहनाच्या काचा उघडया होत्या. त्यानंतर मी माझा
मित्र टोपे, लोकसेवक पोवार व भुसारी असे त्यांचे होंडा सिटी वाहनामध्ये बसलो. त्यावेळी भुसारी हे ड्रायव्हर
सिटवर व त्यांचेबाजुला पोवार व आम्ही दोघे पाठीमागील सिटवर बसलो. आमचेमध्ये कामासंदर्भात चर्चा सुरु
असताना मी त्यांना "बघा, आता काय म्हणताय तुम्ही" असे बोललो. त्यावर लोकसेवक भुसारी हे मला "आम्ही
तर सांगीतलय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "ऐका ना, तुम्ही म्हणताय चाळीस हजार बरोबर ना" असे म्हणालो.
त्यावर लोकसेवक भुसारी हे मला "हा बरोबर सांगा ना" असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवक भुसारी यांना "तुम्ही
फायनल सांगा, मग मी सांगेन" असे म्हणुन "पझेशन जसे झाले तसे आपण तुम्हाला देणार" असे म्हणालो. त्यावर
लोकसेवक भुसारी मला "त्याशिवाय नाही" असे बोलले. त्यावर मी त्यांना "पण तुम्ही ते चाळीस हजार म्हणताय
ना, त्यात थोडेफार काय तरी करा" असे म्हणालो. त्यानंतर पुन्हा आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यावेळी
मी पुन्हा लोकसेवक भुसारी यांना "काहितरी कमी करा" अशी विनंती केली. त्यावेळी लोकसेवक भुसारी हे मला
"ठिक आहे. रिझनेबल सांगीतले, ठिक आहे, फायनल करा, थर्टी फाईव्हला फायनल करा." असे बोलले. त्यावेळी
लोकसेवक पोवार हे मला "करा सर" असे बोलले. त्यावर मी त्यांना "करु, करु" असे म्हणालो. त्यावर लोकसेवक
पोवार हे मला "तुम्हाला माहितीये आपण ज्या दिवशी वॉरंट काढतो. त्या दिवशी घेतो. तुम्हाला माहिती आहे."
असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "बघा चाळीस हजार तुम्हीच म्हणत होते, पस्तीस हजार तुम्हीच म्हणताय, काहीच
अडचण नाही" असे म्हणालो. त्यावर लोकसेवक पोवार मला "तुम्ही पण समाधानी पाहिजे ना" असे म्हणाले.
त्यानंतर निघताना मी त्यांना "संपवु विषय 8 तारखेला" असे म्हणालो. त्यावर लोकसेवक पवार मला "चालतय
चालतय" असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर मी व माझा मित्र नामे श्री
टोपे लोकसेवक यांच्या वाहनातुन खाली उतरलो. आमच्यात झालेले संपुर्ण संभाषण पंच श्री. वालकोळी हे वाहनाचे
पुढील डावे बाजुचे दरवाज्याच्या उघडे असलेल्या काचेजवळ उभे राहुन ऐकत होते. त्यानंतर मी, माझा मित्र टोपे व
पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन माझे वाहनाने पोनि लोणारे व सापळा पथक थांबले त्याठिकाणी 18.30 वा परत
आलो. व घडलेली हकिकत मी व पोनि लोणारे यांना पंच क्रं 02 श्री. सोनवणे यांचे समक्ष सांगीतली.

एकंदरीत झालेल्या पडताळणीवरुन लोकसेवक 1) रविंद्र हिंदुराव पोवार, 2) अमित बबन भुसारी, लिपीक,
भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे यांनी फ्लॅटचा ताबा देण्यासाठी मा न्यायालयाने आदेश केले होते व त्या
आदेशाची अंमलबजावणी व ताबा देणेसाठी 40,000/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती 35,000/- रुपयांची
मागणी करुन अंमलबजावणीच्या दिवशी अंमलबजावणी झालेनंतर दि. 08/04/2025 रोजी सदरची लाच रक्कम
स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन पोनि लोणारे यांनी दि.08/04/2025 रोजी कारवाई
करण्याचे ठरविले व आम्हास दि. 08/04/2025 रोजी लाप्रवि, पुणे कार्यालयात सकाळी 10.00 वा हजर
राहणेबाबत सुचना दिली. त्यानंतर आम्ही सर्व पथक हिंगणे येथील कॅनॉलजवळील रोडवरुन सायं. 18.55 वा चे
सुमारास निघुन लाप्रवि, पुणे कार्यालयात रात्रौ 19.40 वा चे सुमारास परत आलो.

दुस-या दिवशी भाडेकरु यांची मुलगी अंजली खरे यांनी संबधीत न्यायालयात स्टे घेण्यासाठी व मा.सर्वोच्च
न्यायालयात स्पेशल पिटीशन दाखल केल्याने तुर्तास मा.सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालयाने ताबा
आदेशास स्थगिती दिल्याने दिनांक 08/04/2025 रोजीची कारवाई होवु शकत नसल्याचे मी पोनि लोणारे यांना
फोन करुन सांगीतले. त्यानंतर मा.सक्षम प्राधिकारी यांनी दोन्ही पक्षाची बाजु ऐकुन पुन्हा ताबा कारवाईसाठी
25/04/2025 रोजी आदेश पारीत करुन सदरची कारवाई दि.09/05/2025 रोजी करण्यात यावे असे आदेश
पारीत करण्यात आले. परंतु सदर तारखेच्या आगोदरच मा.सक्षम प्राधिकारी, श्री.सी.पी.शेळके यांची बदली झाल्याने
दि.09/05/2025 रोजीची ताबा कारवाई होवु शकली नाही. दिनांक 09/06/2025 रोजी नव्याने हजर झालेले
मा.सक्षम प्राधिकारी श्री.जाधव यांनी दिनांक 12/06/2025 रोजी आदेश पारीत करुन सदरची कारवाई दिनांक
27/06/2025 रोजी करण्यात यावी असे आदेश पारीत केले. त्यानुसार लोकसेवक श्री. रविंद्र पोवार यांनी दिनांक
13/06/2025 रोजी प्लॅट नं बी/16, विशाल पार्क, विठ्ठलवाडी, हिंगणे खुर्द येथे जावुन आमचे भाडेकरु यांना
नोटीस बजावणी केली. त्यानंतर मी सदरची बाब ही दिनांक 24/06/2025 रोजी पोनि लोणारे यांना फोन करुन



Scanned with CamScanner

नोटीसची बजावणी झालेली असुन लोकसेवक हे दिनांक 27/06/2025 रोजी ताबा कारवाई करणार असल्याचे सांगीतले. पोनि लोणारे यांनी आम्हाला दिनांक 26/06/2025 रोजी लाप्रवि कार्यालयात येण्यास सांगीतले. त्यानुसार दिनांक 26/06/2025 रोजी मी व माझा मित्र श्री.टोपे असे लाप्रवि कार्यालयात हजर झालो. त्यानंतर पोनि लोणारे यांनी दिनांक 25/03/2025 ते दि.26/06/2025 पावेतोचा ताब्याच्या अनुशंगाने झालेल्या न्यायालयीन प्रक्रीयेबाबतचा माझा स्वहस्ताक्षरात जबाब नोंदवुन घेतला. त्यानंतर दिनांक 27/06/2025 रोजी लोकसेवक हे ताबा कारवाई करणार असल्याने सापळा कारवाई करणार असल्याचे ठरविण्यात आले.

दिनांक 26/06/2025 रोजी आमचे भाडेकरु श्री. खरे यांनी पुन्हा संबधीत न्यायालयात स्टे करीता अर्ज दाखल केला व सदर अर्जावर दिनांक 27/06/2025 रोजी मा.सक्षम प्राधिकारी यांनी सुनावणी ठेवली असल्याचे मला समजले. म्हणुन मी तात्काळ पोनि लोणारे यांना फोन करुन सदरची बाब सांगीतली व दिनांक 27/06/2025 रोजी सुनावणी दरम्यान काय आदेश होतो ते मी तात्काळ तुम्हाला कळवितो असे सांगीतले. दिनांक 27/06/2025 रोजी मी मा.सक्षम प्राधिकारी यांचे न्यायालयात हजर होतो दुपारी 13.30 वाजेच्या सुमारास मी पोनि लोणारे यांना फोन केला व आमचे भाडेकरु श्री.खरे यांचा अर्ज मा.सक्षम प्राधिकारी यांनी फेटाळलेला असुन आजचे कारवाई करण्याचे आदेश कायम ठेवले आहेत व लोकसेवक श्री. रविंद्र पोवार व श्री. अमित भुसारी हे सायंकाळी 19.00 वाजेच्या सुमारास येणार असल्याचे सांगीतले तसेच माझा मित्र श्री. निलेश टोपे हे सिंहगडरोड पोलीस स्टेशन येथे सदर कारवाई करीता पोलीस बंदोबस्त घेणेकरीता गेलेले असुन त्यांना पोलीस बंदोबस्त मिळालेला आहे. तुम्ही आपले सापळा पथक घेवुन सायंकाळी 18.30 वा हिंगणे खुर्द, सिंहगडरोड येथील कॅनॉल जवळ येण्याची विनंती केली व मी माझ्या वाहनाने मी पुढे जात आहोत, मी आपल्या पथकास त्याठिकाणी भेटतो असे सांगुन मी माझे वाहनाने सव्हे नं 24/6 फ्लॅट नं बी/16, तीसरा मजला, विशाल पार्क सोसायटी, विठ्ठलवाडी हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे या ठिकाणी साधरणता 3.20 ते 03.30 वाजेच्या दरम्यान पोहचलो. मी पोहचणेच्या आगोदर लोकसेवक श्री. पोवार व श्री. भसारी सदर ठिकाणी पोहचले होते. त्यानंतर माझे मित्र श्री. टोपे हे त्याठिकाणी आले व त्यानंतर थोडयाच वेळात सिंहगडरोड पोलीस स्टेशनचे पोलीस बंदोबस्ताचे मपोउनि नम्रता सोनवणे, मपोशि/ काजल जाधव, पोशि/ खुटवड असे 3 जण हजर झाले. पोलीस बंदोबस्त आल्यानंतर लोकसेवक श्री.पोवार व श्री. भुसारी हे ताबा कारवाई सुरु केली. लोकसेवक श्री.पोवार व श्री. भुसारी हे कारवाई झालेनंतर माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार असल्याने तसेच सदर ताबा कारवाईला वेळ लागणार आहे त्यामुळे कारवाई पुर्ण होण्याच्या आगोदर आपणाला फोन करुन सांगतो असे मी पोनि लोणारे यांना फोनवर सांगीतले. साधारण 18.15 वा ताबा कारवाई संपण्याच्या मार्गावर असल्याने मी पोनि लोणारे व सापळा पथक हिंगणे खुर्द, सिंहगडरोड येथील कॅनॉल जवळ थांबलेल्या ठिकाणी 18.30 वा पोहचलो. पोनि लोणारे यांनी पुन्हा सापळा पथकासोबत माझी ओळख करुन दिली. दरम्यान सापळा कारवाईचे अनुषंगाने माझे व पंच क्र 01 वालकोळी यांचे 18.35 वा निवेदन घेतले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी लोकसेवक 1) रविंद्र हिंदुराव पोवार, 2) अमित बबन भुसारी, क्लार्क, भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे यांनी मागणी केल्याप्रमाणे 35,000/- रुपये लाच रक्कम मला हजर करण्याबाबत सांगितले असता मी माझेकडील बचतीतील 500 रुपये दराच्या 70 नोटा असे 35,000/- रुपये लाच रक्कम हजर केली. वरील नमुद नोटांचे नंबर्स पोनि लोणारे यांचे सुचनेनुसार पंच क्र 1 यांनी पंच क्र 02 यांचे मदतीने एका को-या कागदावर माझे समक्ष नमूद करुन घेतले त्यावर पोनि लोणारे व पंचांनी सदर कागदावर सहया केल्या. त्यानंतर पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन पोशि/दिवेकर यांनी शासकीय वाहनामध्ये दोन्ही पंच साक्षीदार आणि मला अल्ट्राव्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. अँथ्रासिन पावडर लावलेल्या वस्तुंवर अंधारामध्ये अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या वस्तुवर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन येते. नेहमीच्या प्रकाशात तशी दिसुन येत नाही. असा या वस्तुंचा गुणधर्म असल्याचे सांगितले. त्यानंतर पोशि/दिवेकर यांनी मी यांनी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 70 भारतीय चलनी नोटा प्रथम नेहमीच्या प्रकाशात व नंतर अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासुन दाखविले असता त्या नोटांवर व कागदावर कसलीही चकाकी दिसुन आली नाही त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या. त्यानंतर पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन सापळा पथकातील पोशि/दिवेकर यांनी 500/-रु. दराच्या 70 भारतीय चलनी नोटा एका कागदावर ठेवून त्या नोटांच्या दोंन्ही बाजुस कापसाच्या बोळ्याने क्रमा-क्रमाने अँथ्रासिन पावडर लावली. व त्यानंतर शासकीय वाहनात कृत्रीम अंधार करुन आम्ही पोशि/दिवेकर यांचे हातातील नोटांवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या सर्व नोटांवर व कागदावर दोन्ही बाजुस अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तशीच चकाकी पोशि/दिवेकर यांच्या दोन्ही हातांच्या बोंटावर देखील दिसुन आली. त्यानंतर शासकीय वाहनात पुन्हा उजेड करण्यात आला. पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन, पोशि/दिवेकर यांनी त्या नोटांचा बंडल माझे पँटच्या पुढील उजव्या खिशांत ठेवल्या. त्यानंतर पोनि लोणारे यांचे सुचनेनुसार पोशि



Scanned with CamScanner

दिवेकर यांनी वापरलेला कापसाचा बोळा व ज्या कागदावर नोटांना अँथ्रासिन पावडर लावली होती तो कागद
जागीच नष्ट केला. त्यानंतर पोशि/दिवेकर यांना हात स्वच्छ धुण्यास सांगीतले असता पोशि/दिवेकर यांनी त्यांचे हात
वाहनातील पाण्याने स्वच्छ धुतले. त्यानंतर पोशि/दिवेकर यांच्या हाताची उजेडात व शासकीय वाहनामध्ये पुन्हा
कृत्रिम अंधार करुन, अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता कोणत्याही प्रकारची चकाकी दिसून
आली नाही. त्यानंतर पोशि/दिवेकर यांना मनुष्यबळाअभावी पुन्हा सापळा पथकात सहभागी करण्यात आले.
त्यानंतर शासकीय वाहनात कृत्रीम अंधारामध्ये माझे हात व कपडे अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याचे प्रकाशात तपासुन
पहाता फक्त त्यांचे अंगातील निळया रंगाच्या जिन्स पँटच्या पुढील उजव्या खिशाच्या आतील भागास लाचेची रक्कम
ठेवलेल्या ठिकाणी अँथ्रासिन पावडरची चकाकी दिसुन आली. तशी चकाकी त्यांच्या हातावर कपडयावर इतरत्र
कोठेही दिसुन आली नाही.

त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला व सापळा पथकास सापळा कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर
19.00 वा व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझ्या शर्टचे आत सेफटी पिनच्या सहाय्याने लावुन पंच नं. 1 श्री.
वालकोळी यांचेसोबत माझी चारचाकी वाहन फोर्ड ईको स्पोर्ट वाहन क्रं एमएच 12 क्युटी 9797 वाहनाने आम्ही
रवाना झालो. त्यावेळेस मी वाहन चालवीण्यास बसलो व पंच क्रं 1 वालकोळी हे माझ्या बाजुच्या सीटवर बसले.
आमचे पाठोपाठ संपुर्ण सापळा पथक असे काही अंतर ठेवून शासकीय वाहनाने आमच्या वाहनाचे पाठोपाठ निघाले.
त्यानंतर मी व पंच वालकोळी हे विशाल पार्क सोसायटीच्या आवारात त्यांचे वाहन पार्क करुन थांबलो. व आम्ही
वाहनातुन उतरुन सोसायटीमध्ये गेलो. पोनि लोणारे व सापळा पथक काही अंतरावर कोणासही संशय येणार नाही
अशा रितीने शासकीय वाहन पार्क करुन विशाल सोसायटी परिसरात सापळा लावुन थांबले. त्यानंतर आम्ही
प्लॅटमध्ये जावुन संपुर्ण ताबा प्रक्रीया पुर्ण केली व त्यानंतर आम्ही सर्वजण सोसायटीच्या पार्कीगमध्ये येवुन थांबलो.
त्यानंतर लोकसेवक श्री. पोवार व श्री.भुसारी हे त्यांचे होंडा सिटी कारमध्ये जावुन बसले, मी व पंच त्यांचे वाहनाचे
बाहेर उभे राहुन त्यांचेशी बोलु लागलो त्यावेळेस लोकसेवक पोवार यांनी "परत तिकड बोबलन, त्याच्यापेक्षा
आपण बाहेरच भेटू, लय माणस आहेत तिथे, चला की बाहेर जाऊ चला, ऐका ना कुठतरी फक्त जेवायला घाला
गाडी" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "चालतय आम्ही कुठय, निघतो आज, जेवायला आम्ही कधी नाय म्हणलय
आता पर्यंत, आता तुम्ही दोन तीन वेळा विषय काढला पण तुमच परत तुमचा फोनच नाय आला" असे म्हणालो.
त्यावर लोकसेवक पोवार मला "नको इथ तर नकोच, लयच लोक, बरीच लोकय इथ" असे म्हणाले. त्यावर मी
त्याना "बर घ्या, तुम्ही घ्या पुढ, मी घेता तुमच्या पाठीमाग" असे म्हणालो असता ते त्या ठिकाणाहुन त्यांचे
वाहनाने निघुन गेले. त्यामुळे मी इशारा न करता कोणासही संशय येणार नाही अशा रितीने शासकीय वाहनात येऊन
बसलो व माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर पोनि लोणारे यांनी 19.45 वा बंद करुन ताब्यात घेतला. त्यावेळी पंच क्रं 2
हे शासकीय वाहनात येऊन बसले. त्यावेळी मी पोनि लोणारे यांना सांगीतले की, लोकसेवक 1) रविंद्र हिंदुराव
पोवार, 2) अमित बबन भुसारी, क्लार्क, भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे हे मला कुठेतरी जेवण करु असे
म्हणुन पुढे गेले असुन त्यांचे मागोमाग माझा मित्र नामे निलेश टोपे त्यांचे मागोमाग गेलेला आहे असे सांगीतले.
त्यानंतर पोनि लोणारे यांनी व्हाईस रेकॉर्डर फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक यांनी
जेवणासाठी पुढे हायवेला भेटण्यास सांगीतल्याने, पोनि लोणारे यांनी मला माझा मित्र श्री. निलेश टोपे यास फोन
करुन हॉटेलचे नाव विचारण्यास सांगीतले असता मी माझ्या मित्राला फोन केला व त्याने जवळच असलेल्या
सिंहगडरोडवरील राधा प्युअर व्हेज येथे असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पोनि लोणारे यांनी पुन्हा व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रं 01 वालकोळी यांना लोकसेवक
यांना भेटणसासाठी 19.58 वा रवाना केले. त्यावेळेस सुध्दा मीच गाडी चालवित होतो व पंच श्री. वालकोळी हे
बाजुच्या सिटवर बसले होते. आम्ही निघाल्यावर आमचे मागोमाग संपुर्ण सापळा पथक सिंहगड रोडवरील राधा
प्युअर व्हेज हॉटेलच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावून थांबले. तेव्हा मी व पंच क्रं
1 वालकोळी आमचेकडील चारचाकी वाहन हॉटेल समोरील सार्वजनीक रोडवर पार्क करुन राधा प्युअर व्हेज या
हॉटेलमध्ये गेलो. त्यावेळी लोकसेवक पोवार लोकसेवक भुसारी व माझा मित्र निलेश टोपे हे हॉटेलमध्ये उपस्थित
होते. आम्ही हॉटेलमध्ये एकाच टेबलावर बसुन मी, माझा मित्र श्री टोपे, पंच क्रं 1 वालकोळी, लोकसेवक पोवार व
लोकसेवक भुसारी यांचेकरीता काही खादयपदार्थापैकी केवळ स्टार्टरची ऑर्डर केली. त्यानंतर आमचेमध्ये माझे
झालेले कामासंदर्भात चर्चा झाली. खादयपदार्थ खाऊन झालेनंतर लोकसेवक पोवार यांनी मला पंचासमक्ष इशा-याने
लाचेच्या रकमेबाबत विचारणा करत "ते पण करुन टाका, त्याच" असे बोलले. त्यावेळी मी उठुन माझ्या वाहनाकडे
निघालो माझ्या मागोमाग पंच क्रं 1 वालकोळी सुध्दा निघाले. आमचे मागोमाग लोकसेवक पोवार व लोकसेवक
भुसारी हे सुध्दा आले. त्यानंतर मी माझ्या वाहनात ड्रायव्हिंग सिटवर जावुन बसलो. व गाडीच्या चारही काचा
खाली केल्या. लागलीच लोकसेवक पोवार हे माझ्या बाजुच्या सीटवर येऊन बसले व लोकसेवक भुसारी हे माझ्या



Scanned with CamScanner

वाहनाच्या मागील सिटवर येऊन बसले. त्यावेळी पंच क्रं 1 वालकोळी माझ्या गाडीच्या पुढील डाव्या
दरवाजाजवळ थांबुन राहीले. त्यानंतर मी दोन्ही लोकसेवक यांना उद्देशुन मागे पाहुन मोठ्या आवाजाने "अमित सर
मोकळ बोला ना, काय असल, उगाच आडपडदा नको" असे बोललो त्यावर लोकसेवक पोवार मला "आता काय
मोकळ बोलायचय" असे बोलले. त्यावर मी त्यांना "काय म्हणजे... नाय नाय पस्तीस जे ठरलेत, ते पस्तीसच
दयायचे का" असे बोललो. त्यावर लोकसेवक पोवार मला "नाय नाय... जास्त दयायला पाहिजे" असे बोलले.
त्यावर मी त्यांना "आपल जे पस्तीस ठरलय ना" असे बोललो त्यावेळी लोकसेवक भुसारी मला "हा" असे बोलले.
त्यावेळी मी त्यांना "तुम्ही सांगा, आता बघा, ताबा झालेलाय" असे बोललो त्यावेळी लोकसेवक पोवार मला
"ताबा झालाय, काय विषय नाय" असे बोलले. त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये झाले कामासंदर्भात चर्चा झाली. चर्चा
सुरु असताना मी लोकसेवक यांना "आपले जे पस्तीस हजार ठरले होते, पहिले" असे बोललो असता लोकसेवक
भुसारी यांनी मला पैशांचा हाताने इशारा करत, "करुन टाका, परत" असे बोलले. त्यानंतर मी माझ्या पँटच्या पुढील
बाजुच्या उजव्या खिशातुन उजव्या हाताने लाच रक्कम काढत असताना "जे पस्तीस ठरले, ते पस्तीस देतो" असे
बोललो त्यावर लोकसेवक पोवार मला "हं.." असे म्हणाले. त्यानंतर मी माझ्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या,
खिशातुन उजव्या हाताने लाच रक्कम काढुन लोकसेवक पोवार यांचेसमोर धरली असता, त्यांनी ती लाच रक्कम त्यांचे
उजव्या हाताने स्विकारुन माझे वाहनाच्या मागील सिटवर बसलेल्या लोकसेवक भुसारी यांचेकडे दिली त्यावेळी
त्यांनी लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पँटच्या उजव्या बाजुच्या मागील खिशामध्ये ठेवली.
त्यावेळी पंच क्रं 1 वालकोळी हे माझे वाहनाच्या डावे दरवाजाजवळ उभे होते व त्यांनी संपुर्ण घटना पाहीली व
ऐकली. त्यानंतर मी लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पोनि लोणारे यांना पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर पथकाने
येऊन दोन्ही लोकसेवक यांना ताब्यात घेतले. पोनि लोणारे यांनी दिलेले सुचनेनुसार चालक पोहवा दिवेकर यांनी
तात्काळ त्यांचे मोबाईलव्दारे चित्रीकरणास सुरुवात केली ती वेळ होती 20.18 वाजेची पोनि लोणारे यांनी लाच
रक्कम कोणी स्विकारली असे पंच क्रं 1 श्री.वालकोळी यांना विचारले असता त्यांनी वाहनाच्या ड्रायव्हींग सीटच्या
बाजुच्या सिटवर बसलेले हे लोकसेवक पोवार असुन त्यांनी लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन गाडीच्या
मागील सीटवर बसलेले लोकसेवक भुसारी यांचे ताब्यात दिलेबाबत सांगीतल्याने पोशि ठाकुर यांनी लोकसेवक
पोवार व पोशि दिवेकर यांनी लोकसेवक भुसारी यांचे दोन्ही हाताच्या मनगटावर पकडले व दरम्यान पोनि लोणारे
यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. ती अंदाजी वेळ 20.20 वा.ची होती. त्यावेळी पोनि लोणारे
यांनी वाहनाच्या पुढील सिटवर बसलेल्या इसमास त्याचे पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव रविंद हिंदूराव
पोवार, वय - 40, पद - लिपीक टंकलेखक, भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे रा. चंद्रांगण, फेज 7, ई
बिल्डींग, बी - 11, आंबेगाव पठार, पुणे असे सांगीतले. त्यानंतर वाहनाच्या मागील सिटवर बसलेल्या इसमास
त्यांचे पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अमित बबन भुसारी वय - 34 वर्षे, पद - लिपीक टंकलेखक,
भाडे नियंत्रण कायदा, न्यायालय, पुणे रा. एल 14, फॉरेस्ट कौंटी, खराडी, पुणे असे सांगितले. त्यानंतर पोनि
लोणारे यांनी लोकसेवक भुसारी यांना माझेकडुन स्विकारलेल्या लाचेची रक्कम बाबत विचारले असता लोकसेवक
भुसारी यांनी लाचेची रक्कम त्यांचे पँटच्या मागील बाजुच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली असल्याचे सांगून
त्यांनी स्वत: पँटच्या मागील खिशामधुन त्यांच्या उजव्या हाताने लाच रक्कम काढून पंचासमक्ष धरली. पोनि लोणारे
यांचे सुचनेवरुन पंच क्रं 2 सोनवणे यांनी सदरील रक्कम ताब्यात घेतली. दरम्यानच्या कालावधीत पोनि लोणारे यांचे
सुचनेप्रमाणे पंच श्री सोनवणे यांनी लाचेची रक्कम ताब्यात घेवून मोजली असता ती रुपये 35,000/-(रूपये 500/-
दराच्या 70 चलनी नोटा) असल्याचे दिसून आले. तसेच सापळापुर्व कारवाई दरम्यान लिहून घेण्यात आलेले नोटांचे
क्रमांक व लोकसेवक भुसारी यांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या नोटावरील क्रमांक हे सापळा कार्यावाहीत
वापरण्यात आलेल्या नोटांचेच असल्याची खात्री झाली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी सदर लाच रकमेचे नोटांचे नंबर्स
सापळापुर्व कारवाई दरम्यान को-या कागदावर लिहीलेल्या नोटांचे नंबरशी पडताळणी केली असता त्या तंतोतंत
जुळून आल्या.

पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन नमुद दोन्ही लोकसेवक यांना शासकीय वाहनामध्ये बसविण्यात आले त्यानंतर
शासकीय वाहनामध्येकृत्रीम अंधार करुन, अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या सहाय्याने प्रथम सापळा पथकातील
अधिकारी/अंमलदार यांचे हात व कपडयांची तपासणी केली असता कोठेही अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळया
रंगाची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर पंच क्रं 2 श्री सोनवणे यांचे हातास अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळया
रंगाची चकाकी दिसून आली. कारण त्यांनी सापळा यशस्वी झालेनंतर लाच रक्कम लोकसेवक यांचेकडून ताब्यात
घेतली होती. ताब्यात घेतलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर देखील फिक्कट
निळया रंगाची चकाकी दिसून आली. लोकसेवक पोवार यांची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताला व
हाताच्या बोटांना अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगांची चकाकी दिसून आली. त्यानंतर लोकसेवक भुसारी



Scanned with CamScanner

यांची तपासणीकेली असता त्यांचे उजव्या हाताला अँथ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली व त्यांचे पँटच्या मागील बाजुच्या उजव्या खिशाच्या तोंडावर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली तसेच माझ्या हाताची व कपडयांची तपासणी केली असता, माझ्या उजव्या हाताच्या बोटांच्या वरील भागास अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पॅन्टच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशाचे तोंडावर व आतील बाजुस अँन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी दोन्ही लोकसेवक यांना ताब्यात घेवुन लाप्रवि कार्यालयात घेवुन आले व त्यांचेवर पुढील कारवाई करण्याचे पोनि लोणारे यांनी ठरविले व संपुर्ण सापळा पथक आरोपी यांचेसह लाप्रवि कार्यालयात परत आले ती वेळ होती 21.30 वा. ची होती.

तरी दि. 25/03/2025 रोजी हॉटेल मल्हार किचन येथे झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. रविंद्र पोवार व श्री. अमित भुसारी पद- लिपीक टंकलेखक, मा.सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे विभाग, पुणे यांनी मा.सक्षम प्राधिकारी यांचे आदेशानुसार माझे फलॅटचा ताबा देणेसाठी 40,000 /- रुपयाची लाच मागीतली व तडजोडी अंती 35,000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले व दिनांक 27/06/2025 रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान राधा प्युअर व्हेज, सिंहगडरोड येथील रोडवर माझे फोर्ड ईको स्पोर्ट वाहन क्रMH12QT9797 यामध्ये लोकसेवक श्री. रविंद पोवार व श्री. अमिल भुसारी पद- लिपीक, मा. सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे विभाग पुणे यांनी माझ्याकडुन पंचासमक्ष 35,000/-रुपये लाच रक्कम स्विकारली, म्हणुन माझी नमुद दोन्ही लोकसेवकाविरुध्द कायदेशीर तक्रार आहे. सदर बाबत पोनि लोणारे साहेब यांनी घडलेल्या सर्व घटणेचा सविस्तर पंचनामा केला आहे. माझा वरील जबाब मी वाचुन पाहीला असून, तो माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष हा जबाब लिहुन दिला स.ता.म

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or (किंवा)**

dilip pandurang daingade(I (Inspector)) /

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.(क्र.):**

**Rank (पद):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Ramya

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
सिंहगड रोड, पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** dilip pandurang dair
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

वरिष्ठ पोलिस निरीक्षक
सिंहगड रोड, पो. ठाणे, पुणे शहर



Scanned with CamScanner